# वार्षिक अहवाल

२०२२-२३




## व्हिजन (ध्येय) –

ध्येयप्रेरित व समर्पित कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांच्या सामुहिक प्रयत्नांमधून बलशाली समाज उभा करणे.

## मिशन (ध्येयपथ) –

- सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सबलीकरण करणे.
- सामुहिक प्रयत्नांमधून विकासोन्मुखी कार्यक्रमांच्या आधारे व्यापक सामाजिक उत्कर्षासाठी प्रयत्न करणे.
- लोकसहभागातून सामाजिक विश्वासाचे वातावरण निर्माण करणे.



## संस्था सक्षमीकरण

पश्चिम महाराष्ट्रातील २६ संस्थांबरोबर चालू असलेल्या संस्था सक्षमीकरण या प्रकल्पाला गती देण्याकरिता विभागशः बैठकांचे नियोजन करण्यात आले. मा.श्री. अतुलजी लिमये - क्षेत्र प्रचारक, श्री. यशोवर्धन वाळिंबे - प. महाराष्ट्र प्रांत प्रचारक. मा. डॉ. प्रवीण दबडघाव - प्रांत कार्यवाह, व श्री. शैलेंद्र बोरकर - प्रांत सेवा प्रमुख यांच्यासह सेवावर्धिनीच्या टीम मधील श्री. प्रमोद कुलकर्णी व श्री. मंगेश घाटपांडे यांनी सहभाग नोंदवला.

विभागानुसार घेतलेल्या बैठकांमध्ये विभाग कार्यवाह, विभाग प्रचारक, विभाग सेवा प्रमुख सहभागी झाले होते.

विभागातील सेवा संस्थांच्या सद्य स्थितीवर यात सखोल चर्चा झाली आणि विभागातील संस्थांचे अल्प व दीर्घकालीन कामाचे नियोजन (रोड मॅप) करण्यासाठी सेवावर्धिनीने संस्थाशी बोलून कार्यशाळा घ्याव्यात असे नक्की करण्यात आले. याचबरोबर रोड मॅप सेशनसाठी लागणाऱ्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

बैठकीत ठरल्यानुसार नाशिक विभागातील व्यंकटेश बापट चॅरीटेबल ट्रस्ट, राष्ट्रहित संवर्धन मंडळ आणि नगर मधील अण्णासाहेब कदम पाटील सेवा प्रतिष्ठान या तीन संस्थांचे रोड मॅप सेशन पूर्ण करण्यात आले .

नाशिक विभागातील उर्वरित संस्था तसेच पुणे व कोल्हापूर विभाग यातील संस्थांचे रोड मॅप सेशनचे वेळापत्रक करण्याचे काम सुरु आहे.

## संस्था मानांकन

### संस्था निवड प्रक्रिया

सेवा संस्थांचे मूल्यांकन / मानांकन करण्याची प्रक्रिया विकसित केली. मुख्य ६ विषयांच्या आधारे प्रश्नावली तयार करण्यात आली. प्रश्नावलीचे मुद्दे - १. Sustainability २. Team ३. Project Mgt ४. Vision - Mission ५. Systems and processes ६. Impact on society

प्रश्नावलीतील प्रश्न संस्थेच्या विविध स्तरातील लोकांना विचारण्यात आले.

प्रातिनिधिक स्वरुपात (pilot) प्रकल्पामध्ये ६ संस्थांचा समावेश होता, यामध्ये ग्रामीण - शहरी, नवीन - जुनी, आर्थिक उलाढाल (turnover) कमी - थोडा जास्त अशा संस्थांची निवड केली होती.

सेवावर्धिनीच्या विविध प्रकल्पाच्या माध्यमातूनही संस्था सक्षमीकरणावर भर दिला जातो.प्रत्यक्ष सेवा कार्य करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर मार्ग काढण्यासाठी सेवा संस्था कसा विचार करतात हे या सहभागाने सेवावर्धिनीला शिकता येते. तर प्रकल्प लेखन, सादरीकरण, प्रकल्प व्यवस्थापन या गोष्टी सेवा संस्था शिकतात. तर प्रकल्प सुरु असताना व पूर्ण झाल्यावर करायचे अहवाल लेखन, आर्थिक व्यवहारांची योग्य नोंद ठेवणे, युटीलायझेशन प्रमाणपत्र देणे अशा अनेक विषयावर भर दिला जातो. विविध प्रकल्पात सहभागी झालेल्या संस्थामध्ये खालील बदल झाल्याचे जाणवले.

## सहयोगी संस्थांमधील परिवर्तन

- नवीन भौगोलीक कार्यक्षेत्रात संधी,
- नवीन सामाजिक क्षेत्रात संधी,
- नवीन कार्यपद्धती
- CSR प्रक्रिया आणि टेंडर प्रक्रिया पद्धती, खर्चाच्या पद्धती आणि कागदपत्रांची पूर्तता,
- प्रकल्प अंमलबजावणी, प्रकल्प अहवाल लेखन, प्रकल्प प्रस्ताव लेखन,
- विविध शासकीय, प्रशासकीय संस्थांशी जोडणी -GSDA, MRSAC, KVK,
- काम करण्यासाठी सर्वेक्षणातून गावांची नेमकी निकड समजून घेणे,
- उपलब्ध संसाधनांचा वापर करणे,
- कामाचे नियोजन करणें
- आर्थिक स्तर उंचावणे, खर्चात बचत होणे, स्वयंसिद्ध होण्याकडे वाटचाल,
- शास्त्रीय प्रशिक्षणांतून प्रशिक्षित कार्यकर्ता,
- नवे हितसंबंध,
- सरकारपर्यंत काम आणि संस्था पोहोचणे,
- लोकसहभाग वाढला, जनसंपर्क प्रस्थापित होणे
- ५८ संस्थांमार्फत प्रकल्प राबवले, ९०० संस्थांपर्यंत थेट पोहोचलो, पिंपरी चिंचवड मधील ६६ गृहसंकुलांमध्ये पोहोचलो, २२७ संस्था सेवा तरंग मधून जोडल्या

# वैविध्यपूर्ण प्रकल्पाच्या माध्यमातून संस्था सक्षमीकरण

## जलदूत २.०

स्थळ : महाराष्ट्रातील २५ गावे

लाभार्थी : ५०१७४

सहयोगी संस्था : महाराष्ट्रातील २१ संस्था

जलदूत २.० प्रकल्प २०१९ ते २०२१ या कालावधीमध्ये राबविण्यात येणार होता परंतु कोविड महामारीमुळे प्रकल्प कालावधी मार्च २०२३ पर्यंत वाढविण्यात आला. प्रकल्पाच्या पहिल्या वर्षात ५ प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. संस्था जलदूत यांच बरोबर गावकर्यांचा ही सहभाग जलदूत २.० चे खास वैशिष्ट्य म्हणता येईल. त्याचबरोबर या विषयांसंबंधित सहकारी विभाग व विविध शिक्षण संस्था ही या प्रकाल्पस्ठी जोडल्या गेल्या.

### प्रशिक्षणे

- मृदा आणि जलसंधारण,
- ग्रामीण सहभागीय मुल्यावलोकन - PRA
- नेट प्लानिंग ,
- भूजल सर्वेक्षण,
- शेती आणि शेतीपूरक व्यवसाय.

आणि गावात स्थापन केलेल्या समितीसाठी जलव्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात देण्यात आले.

कोविड काळात पर्जन्यमोजणी, विहीर पाणीपातळी मोजणी इत्यादी कामे करण्यात आली. ॲटलास कॉप्कोच्या सहयोगाने सर्व संस्थांच्या लाभार्थ्यांना अडचणीच्या काळात धान्य वाटप व औषधांचे वाटप करण्यात आले. एप्रिल २०२२ पासून जलसंधारणाची विविध कामे करण्यात आली त्याचा तपशील खाली जोडला आहे.

जलदूत संदर्भ ग्रंथ: या प्रकल्पांतर्गत सर्व जलदुतांसाठी जलदूत नावाचा संदर्भ ग्रंथ तयार करण्यात आला व जलदूत २.० च्या समारोप कार्यक्रमात याचे प्रकाशन करण्यात आले. VWSSP म्हणजेच गावातील पाण्याचा सुरक्षितता आणि शाश्वतता आराखडा तयार करण्यात आला व त्यात प्रत्येक गावाचा पाण्याचा ताळेबंद आखण्यात आला. या ताळेबंदानुसार विविध पिक व सिंचन पद्धती प्रस्तावित करण्यात आल्या प्रत्येक गावात पाण्याच्या नियोजनासाठी जलव्यवस्थापन समिती ग्रामपंचायतीच्या अनुमतीने तयार करण्यात आली.

जलदूत २ प्रकल्प सहयोगी संस्था बैठक: १० – ११ जानेवारी २०२३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, गंगापूर रोड नाशिक येथे यश इन सभागृहात घेण्यात आली.

बैठकीचा मुख्य उद्देश, मार्च २०२३ मध्ये पूर्ण होणाऱ्या जलदूत २ प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण आढावा घेणे आणि आवश्यक मदत आणि अडचणी सोडवून अंतिम स्वरूप देणे असा होता. या बैठकीस जलदूत कोअर ग्रुप मधील ६ तज्ञ प्रतिनिधी, सेवावर्धिनीचे ५ कार्यकर्ते, १७ सहयोगी संस्थांचे २१ प्रतिनिधी, अॅटलास कॉप्कोचे श्री.अभिजित पाटील आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संचालक डॉ. जयदीप निकम, प्रा. रचना रानडे इत्यादी उपस्थित राहिले.

**जलदूत २.० समारोप:** जलदूत प्रकल्पाच्या समारोप सोहळयात प्रत्येक संस्था आणि गाव जलदूत यांचे, प्रकल्प आणि त्या अंतर्गत केलेल्या जलसंधारणाच्या कामाचे तसेच संस्थेने त्यांच्या कार्याक्षेत्रात इतरत्र केलेल्या जलदूत आधारित कामाचे सादरीकरण स्पर्धात्मकरित्या घेण्यात आले.

या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट जलदूत आणि सर्वोत्कृष्ट संस्था अशी ६ पारितोषिके देण्यात आली.

| **जलदूत पारितोषिक** | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | हरीदास राऊत व कृष्णा राऊत | मुरूमहट्टी | १५०००० |
| द्वितीय क्रमांक | अजित गावित व योगेश गावित | रगतविहिर | १००००० |
| तृतीय क्रमांक | मधुकर गागरे , किरण सूर्यवंशी | कानडगाव | ७५००० |
| **संस्था पारितोषिक** | | | |
| प्रथम क्रमांक | वनवासी कल्याण आश्रम | नाशिक | १५०००० |
| द्वितीय क्रमांक | संस्कृती संवर्धन मंडळ | सगरोळी | १००००० |
| तृतीय क्रमांक | नवी उमेद | पांढरकवडा | ७५००० |

पारितोषिकाची रक्कम गावातील जलसंधारणाच्या कामासाठी वापरण्यात यावी अशी संकल्पना होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री नितीन करमाळकर, श्री.अभिजित पाटील, कबीर गायकवाड, यशदा चे श्री आनंद पुसावळे या कार्यक्रमाला उपस्थित होते.


जलदूत प्रकल्पांतर्गत २३ गावांमध्ये झालेली जलसंधारणाची कामे:


| Village | Partner Organization | Intervention | Beneficiaries |
|---|---|---|---|
| Abhone Tanda | Sevavardhini | Disilting of PT and strengthening | 875 |
| Akkalkos | Bhimraj Bahuuddesiya SSVS | CNB | 909 |
| Alsunde | Abhinav Bharat Samaj Mandal | Repairing of Farm Bunds | 1102 |
| Bhimsenpur | NEED | Rejuvination of Well and provide Tap water system | 314 |
| Bhivgad | Jankalyankari Samiti | Disilting of 5 nallas and Malgujari Talav, Construction of Spill Way | 410 |
| Bori | Sampoorna Bamboo Kendra | Disilting of nalla | 1060 |
| Chincholi | Sevavardhini | Disilting of nalla | 859 |
| Dhamangaon Deshmukh | Vidya Niketan Bahu Uddeshiya Sanstha | Construction of New Well | 1197 |
| Dhamari | Baburao Daundkar Smarak Samiti | CNB | 3909 |
| Gardi | Mata Balak Utkarsh Pratishthan | Repairing and strengthening of PT | 3226 |
| Gharalwadi | Janakalyan Pratishthan | Repairing and strengthening of PT | 1157 |
| Guhini | Rajgad Torana Samajonyati Nyas | Solar Pumping on Well | 548 |
| Jarur | Navi Umed | CNB | 579 |
| Kanadgaon | Annasaheb Kadam Patil Pratishthan | Nalla Joining by pipeline for excess water | 3259 |
| Kasewadi | Savitribai Phule Mahila Ekatma Samaj Mandal | Repairing of Percolation Tank (PT) | 626 |
| Madgyal | Sheti Parivar & Kalyan | CCT | 825 |
| Manjaram | Sanskruti Sanvardhan Mandal | CCT | 6453 |
| Murumhati | Vanvasi Kalyan Ashram, Nashik | Well construction and water distribution system | 1074 |
| Nafarwadi | Rashtriya Sarvangin Gram Viskas Sanstha | Repairing of K.T. Weir | 1379 |
| Padali | Bhogavati Sanskrutik Mandal | Water storage tanks & Water distribution system | 1884 |
| Ragatvihir | Vanvasi Kalyan Ashram, Nashik | 35 Individual Water Storage Tank | 1149 |
| Vadiramasgaon | Amrataru Bahu-uddeshiya | Strengthning of 3 nalla earthern bund and stone pitching | 2257 |
| Yeoti | Lokseva Samiti | Disliting of nalla | 2395 |


ज्ञानगंगा घरोघरी
ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्र
LIBRARY & RESOURCE CENTRE






जलदूत
पथिक शाश्वत विकासाचा


सेवावर्धिनी, ही सामाजिक स्वयंसेवी संस्था १९९८ साली स्थापन झाली. "सामाजिक संस्थांचे सक्षमीकरण" हे सेवावर्धिनीचे उद्दिष्ट आहे. सेवावर्धिनीचे अखिल महाराष्ट्रातील २५० पेक्षा अधिक सामाजिक संस्थांचे मजबूत जाळे आहे. "समर्पित आणि वचनबद्ध स्वयंसेवी कार्यकर्त्यांसह सामाजिक संस्थांच्या एकत्रित प्रयत्नातून सक्षम समाजाची निर्मिती " करण्याचे उद्दिष्ट घेऊन सेवावर्धिनी जलसंधारण, शेती आणि ग्रामविकास, किशोर किशोरी विकास, उपजीविका, स्वावलंबन इत्यादी क्षेत्रात काम करत आहे.
संपर्कासाठी : contact@sevavardhini.org 020 24499606, 24432606

# भटके विमुक्त समाज सशक्तीकरण

**स्थळ :** पारधी वस्ती, गाव - साडे, तालुका - करमाळा, जिल्हा - सोलापूर

**लाभार्थी** : भटके विमुक्त समाजातील गाय पारधी महिला, जे अल्प भूधारक आहेत असे लाभार्थी

**सहयोगी संस्था** : अभिनव भारत समाजसेवा मंडळ, सालसे, तालुका करमाळा

## प्रकल्पामुळे सहयोगी संस्थेच्या कामात झालेले बदल:

योग्य लाभार्थी शोधणे त्यांचे प्रशिक्षण करणे, प्रकल्पाची नियमित व अद्ययावत माहिती एकत्रित करणे, लाभार्थी पाठपुरावा करणे, प्रकल्प पूर्ण झाल्यावर अहवाल लेखन करणे अशा अनेक मुद्द्यांच्या आधारे संस्थेच्या कामकाजात बदल झाल्याचे लक्षात आले.



## प्रकल्पात झालेली कामे

- प्रशिक्षण झालेल्या पारधी समाजातून १२ लाभार्थी निवडले,
- गाय वाटप केले,
- गायींचा विमा उतरवणे गोदान सोहळा, साडे (करमाळा)
- गो आधारित विषमुक्त शेती व गो आधारित विविध वस्तू निर्मिती देवलापार (नागपूर) येथे १०० पारधी बांधवांना गोसंवर्धन प्रशिक्षण,
- गेल्या काही वर्षांपासून भटके विमुक्त सशक्तीकरण प्रकल्पाच्या माध्यमातून सेवावार्धिनी सोलापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या समाज घटकांसोबत काम करत आहे.
- महिला बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसायाला चालना देणे, पारंपारिक व्यवसायांना प्रोत्साहन देणे तसेच व्यवसायासाठी आवश्यक प्रशिक्षण व कर्ज मिळविण्यासाठीच्या योजनांची माहिती देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे असे उपक्रम या प्रकल्पांतर्गत आत्तापर्यंत झालेले आहेत.







# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बारव पुनरुज्जीवन प्रकल्प

**स्थळ :** बंगाली बारव - जेजुरी

**लाभार्थी** : बारव मधून पाणी पुरवठा केला जाणारे नागरिक आणि जेजुरी येथे येणारे यात्रेकरू

**सहयोगी संस्था** : जेजुरी नगर परिषद, उघड्या मारुती मंडळ, शरदचंद्र पवार वाणिज्य महाविद्यालय, जिल्हा परिषद मुलींची प्राथमिक शाळा

## प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप:

जेजुरी या धार्मिक पर्यटनस्थळी एकूण ७ बारव आहेत. यापैकी जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात 'बंगाली' नावाने ओळखली जाणारी 'नंदा' पद्धतीची म्हणजेच एका बाजूने पायऱ्या असलेली बारव आहे. बारवेच्या भिंतीवर मोठ्या झाडांची वाढ झाली होती, पायऱ्यांवर आणि मुख्य विहिरीच्या तळाशी गाळ साठला होता. सेवावर्धिनीने जेजुरीतील बंगाली बारवेचे काम प्राधान्याने करण्याचे ठरविले. या कामासाठी **माइंडटिकल** या कंपनीचे आर्थिक सहाय्य मिळाले तसेच जेजुरी नगर परिषद आणि परिषदेचे मुख्य अधिकारी श्री चारुदत्त इंगुले यांनी सहकार्य केले. २ मार्च रोजी उद्घाटनाचा कार्यक्रम झाला आणि प्रत्यक्ष कामास बारव भोवतीची काटेरी झाडी काढुन सुरुवात झाली. ११ मार्च रोजी जेजुरी येथील शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या प्रथम, द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेच्या ३४ विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे शिक्षक, जेजुरी नगर परिषदेचे स्वच्छता कर्मचारी **माइंडटिकल** कंपनीचे अधिकारी आणि सेवावर्धिनीचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. यावेळी बारवेच्या आतील देवडीची स्वच्छता करण्यात आली. प्रकल्पात झालेल्या कामांची यादी पुढीलप्रमाणे

- जुने कुंपण काढणे - १ दिवस
- झाडांवर केलेली कलमे काढणे आणि झाडी तोडणे - ३ दिवस
- बारव पाणी उपसा - ५ HP पंप - १ आठवडा, गाळ काढणे - ३०० लॉरी - १ आठवडा
- आतील भिंतींची स्वच्छता - २ दिवस
- संपूर्ण नवीन जाळीचे कुंपण करणे - १ आठवडा
- सर्व राडारोडा आणि कचरा उचलणे - १ दिवस
- संपूर्ण स्वच्छतेनंतर संपूर्ण बारव केवळ १ आठवड्यात स्वच्छ ताज्या पाण्याने भरली.

१४ एप्रिल २०२३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने लोकार्पण करण्याचे नियोजन करण्यात आले.








mindtickle
चंगाळी बारव स्वच्छता

## जलसंधारण: शिवकालीन पाण्याचे टाके दुरुस्ती

**स्थळ :** गोहे खुर्द, तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे

**लाभार्थी** : गाडेकर वस्ती १५ घरे

**सहयोगी संस्था** : पर्सिस्टंट फौंडेशन या संस्थेचा आर्थिक सहयोग लाभला

### प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप :

गोहे खु. या ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या गाडेकर वस्ती या ठिकाणी उन्हाळयात पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. या अडचणीवर उपाय म्हणून गावाने शिवकालीन पाण्याचे टाके बांधले होते. खूप पाऊस आणि भूस्खलनामुळे या टाक्याची उजव्या बाजूची भिंत कोसळली होती. त्यामुळे टाक्यात राडारोडा पडला होता. तसेच वापर बंद झाल्याने पालापाचोळा जमा झाला होता. हा सगळा भाग स्वच्छ करून उजव्या बाजूने भराव टाकून दगडी पिचिंग केले. त्यावर एक इंच लोखंडी जाळी पसरवून कॉँक्रिटीकरण करण्यात आले. पुढच्या बाजूच्या भिंतीला पण भविष्यातील सुरक्षेच्या दृष्टीने हे काम करण्यात आले. पाळीव आणि जंगली प्राणी यांच्या सुरक्षेसाठी या बाजूला लोखंडी जाळीचे कुंपण करण्यात आले.

हे टाक्याचे काम मार्च २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात आले. आता या टाक्यात पावसाचे पाणी साठून, उन्हाळयात म्हणजेच फेब्रुवारी ते मे या कालावधीत वापर करता येऊ शकेल अशी व्यवस्था पूर्ण झाली आहे.











## रेन वॉटर हार्वेस्टिंग

**स्थळ :** श्री दत्त योगीराज बहुउद्देशीय सामाजिक संस्था, तालुका - कर्जत, जिल्हा – अहमदनगर

**लाभार्थी** : आश्रमातील सर्व विद्यार्थी व अन्य साधारण पणे २०० व्यक्ती

**सहयोगी संस्था** : श्री दत्त योगीराज बहुउद्देशीय सामाजिक आश्रम

**प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप :**

१. सर्वात आधी या प्रकल्पासाठी घरावरचे पत्रे, छतावर पडणारे पाणी, पन्हाळी आणि पाईपच्या माध्यमातून एकत्र केले.
२. एकत्र केलेले पाणी, बोअर, विहीर किंवा एक मोठी पाण्याची टाकी अशा ठिकाणी साठविणे गरजेचे असते, त्यामुळे हे पाणी या प्रकल्पात बोअरच्या माध्यमातून भूगर्भातील एकदम खालच्या थरात म्हणजेच Aquifer Layer पर्यंत पोहचविण्याचे काम केले.
३. हे करत असताना बोअरच्या बाजूने एक खड्डा करून घेण्यात आला. तो खड्डा फिल्टर तयार करण्यासाठी भरून घेत असताना सर्वात खालील २ फुटाच्या थराला जो बोअर मधील केसिंग पाईप आहे त्या पाईपला छिद्र करण्यात आली. त्यानंतर २ - २ फुट अशा अंतराचे तीन वेगवेगळे थर तयार करण्यात आले. त्यामध्ये सर्वात खालचा थर हा मोठे दगड – गोटे, दुसरा थर हा थोडी जाड खडी आणि सर्वात वरचा थर हा मोठ्या आकाराची वाळू अशा प्रकारच्या तीन थरांनी हा खड्डा पूर्णपणे भरून घेण्यात आला. जेणेकरून या खड्यात सोडलेले पाणी फिल्टर होऊन, छिद्रातून बोअरमध्ये जाईल आणि त्यातून भूगर्भातील Aquifer Layer हा भरून येईल.
४. या प्रकल्पासाठीचा कालावधी ठरविताना या २०२२ यावर्षीच्या पाऊसाचे पाणी हे या प्रकल्पाद्वारे भूगर्भातील Aquifer Layer या थरापर्यंत पोहोचविणे या हेतूने या प्रकल्पाचा कालावधी हा दोन महिन्याचा होता. हा प्रकल्प साधारणपणे एप्रिल २०२२ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरु झाला आणि हा प्रकल्प मे २०२२ महिन्याच्या शेवटी पूर्ण करण्यात आला. या प्रकल्पामुळे जून पासून सुरु झालेल्या पाऊसाचे पाणी हे बोअरच्या माध्यमातून भूगर्भात पोहचविण्यात आले आहे.
५. या प्रकल्पाच्या माध्यमातून अंदाजे १,४९,३२५ लिटर पाणी हे छतावरून बोअरच्या माध्यमातून भूगर्भातील Aquifer Layer (भूजल धर) मध्ये पोहचविण्याचे काम या प्रकल्पाच्या माध्यमातून केले आहे.


OPPO A55
2022/06/17 07:38




OPPO A55
2022/06/13 08:23

## सौरऊर्जा - ग्रीन स्वीच सोलार ग्रीड

**स्थळ :** उंबरणेवाडी, इरशाळवाडी, आरकसवाडी - पिरकटवाडी ता. खालापूर, जि. रायगड, सुळेवाडी ता. पेण, जि. रायगड

**लाभार्थी** : सर्व वाड्यांमधील लाभार्थी संख्या मिळून - ६५८

**सहयोगी संस्था** : ग्रामऊर्जा सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड

### प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप :

सर्व वाड्यामधील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम एप्रिल २०२२ मध्ये पूर्ण झाले. त्यानंतरचे एक वर्ष कामातील अडचणी समजून घेणे व त्याचे निराकरण करणे यासाठी राखून ठेवण्यात आले होते. इरशाळवाडीवर सोलर या विषयात काम करताना त्यांची विजेची गरज पाहून त्या ठिकाणी Customized Energy Solutions India Pvt. Ltd या कंपनीच्या माध्यमातून त्या ठिकाणी सोलरच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या विजेचे नोंदणी करून त्यातून वाचणाऱ्या विजेवर आधारित व्यवसाय असा प्रकल्प करण्यासाठी त्यांनी त्या ठिकाणी पिठाची चक्की देण्याचे काम केले. दुर्दैवाने त्या ठिकाणी भूस्खलन होऊन संपूर्ण वाडी नष्ट झाली. वस्तीमधील लोकांची संख्या मोजणे व मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या या कामात सेवावर्धिनी मार्फत झालेल्या सर्वेक्षणाचा उपयोग झाला. उंबरणेवाडी मधील प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या समितीचे बँक खाते उघडण्याचे काम हे या वर्षी करण्यात आले.





## स्वावलंबी भारत अभियान

**स्थळ :** पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील ७ जिल्हे

### प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप :

स्वावलंबी भारत अभियानांतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यात रोजगार सृजन / उद्योजकता विकास केंद्रे स्थापन झाली आहेत. या केंद्रांवर अनेक उद्योगोइच्छुक व नोकरी मागणारे लोक मार्गदर्शन घेण्यासाठी रोज येतात. प्रत्येक जिल्ह्यात संघरचनेतील २० संघटनामधील एक किंवा दोन कार्यकर्ते सदस्य मिळून जिल्हा समन्वय मंडळ स्थापन केले आहे. मुख्य प्रांत समन्वयक, सहसमन्वयक आणि महिला समन्वयक यांनी पूर्णकालिक कार्यकर्त्यांचे दरमहा बैठक आणि प्रशिक्षण घेतले आहे. दर महिन्याला जिल्हा समन्वय मंडळाच्या १ प्रत्यक्ष आणि १ ऑनलाइन बैठकी झाल्या आहेत. या प्रकल्पात १७ गावात छोट्या प्रमाणात ग्रामसर्वेक्षण करण्यात आले, ज्यातून कोणत्या उद्योगाला मागणी आहे ते कळले (scoping study). तसेच एकूण ३ स्वदेशी मेला अर्थात उद्योजकांसाठी खरेदी विक्री प्रदर्शने आयोजित करण्यात आली उदा. नाशिक येथे चैत्र पालवी, पापड महोत्सव आणि सातारा येथे भरड धान्य महोत्सव इ. दर आठवड्याला शनिवारी पिंपरी चिंचवड येथील केंद्रात महिला नवउद्योजकांना समर्थन म्हणून एक प्रदर्शन भरवण्यात येते. यामधून महिला नवउद्योजकांना मार्केटिंगचे प्रोत्साहन मिळते.

| अ.क्र | जिल्हा | सहयोगी संस्थेचे नाव | प्रोत्साहन संमेलने | उद्योजकता परिचय वर्ग/ प्रशिक्षणे | स्कील ट्रेनिंग | उद्योजक / व्यावसायिक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर | विद्या प्रबोधिनी | ७ | | | १६ |
| २ | सांगली | डेक्कन एजुकेशन सोसायटी | ६ | १ | १ | ५ |
| ३ | सातारा | डेक्कन एजुकेशन सोसायटी | १२ | २ | | ४३ |
| ४ | पुणे | स्वा. सावरकर मंडळ | १८ | ३ | | ८ |
| ५ | सोलापूर | शिक्षण प्रसारक मंडळी | २० | १ | १ | २८ |
| ६ | नाशिक | नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ | ३४ | १ | २२ | २४५ |
| ७ | नगर | हिंद सेवा मंडळ | ८ | १ | | |


स्वावलंबी भारत अभियान
उद्योजकता विकास यात्रा
Cbankur | Kondi | 2023.08.21 11:24



स्वावलंबी भारत अभियान
पश्चिम महाराष्ट्र प्रांत
अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,
उद्योजकता विकास यात्रा
MySBA

## एक मुठ्ठी अनाज अभियान

सेवावर्धिनीच्या माध्यमातून पुणे महानगरातील, पिंपळे सौदागर, रहाटणी, पिंपळे निलख, विशाल नगर, थेरगाव, हिंजवडी, विश्रांतवाडी या भागातील ६६ सोसायट्यांच्या माधमातून प्रत्येक महिन्यात गहू, तांदूळ, तुरडाळ, मुगडाळ असे धान्य गोळा केले जाते. आपल्या समाजात दातृत्वाची भावना मूलतः आहेच, म्हणून फक्त धान्याबरोबर तेल, शेगदाणे, बिस्कीट, मॅगी असे साहित्य पण गोळा गेले जाते. या अभियानाची सुरुवात जुलै २०२१ पासून सुरु झाली आहे. परिसरातील २३००० घरांपर्यंत संपर्क साधणारे ४८० कार्यकर्ते बहुराष्ट्रीय कंपन्या मध्ये काम करणारे आहेत. आपण समाजाचे देणे लागतो हा विचार करून हे कार्यकर्ते काम करीत आहे. या आर्थिक वर्षात गोळा झालेले धान्य व त्याचे वाटप याचा तक्ता खाली दिला आहे

| अ.क्र | संकलन महिना | धान्य | दान केलेल्या संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२२ | ३५२९ | स्व. तात्या बापट स्मृती समिती<br>श्री दत्त योगीराज बहुउद्देशिय सामाजिक संस्था<br>जनकल्याण समिती |
| २ | मे | १९९१ | वनवासी कल्याण आश्रम<br>चैतन्य महिला मंडळ |
| ३ | जून | ३१७५ | माई बालभवन<br>किनारा वृद्ध व मतीमंद सेवा ट्रस्ट |
| ४ | जुलै | ३२२३ | जीवन मित्र एजुकेशन सोसायटी |
| ५ | ऑगस्ट | ३००७ | अपना घर (माझं घर फौंडेशन )<br>चैतन्य महिला मंडळ |
| ६ | सप्टेंबर | ५२८१ | संकल्प आदिवासी पारधी समाज संस्था<br>स्व. स्व. तात्या बापट स्मृती समिती<br>उर्जा प्रतिष्ठान |
| ७ | ऑक्टोबर | ६३०६ | वनवासी कल्याण आश्रम, भोर<br>वनवासी कल्याण आश्रम, कनासे<br>स्पंदन बाल आश्रम |
| ८ | नोव्हेंबर | २८५१ | स्व. तात्या बापट स्मृती समिती<br>स्नेहवन संस्था चाकण |
| ९ | डिसेंबर | ५०९५ | शांतीवन संस्था बीड<br>अजित फौंडेशन<br>वनवासी कल्याण आश्रम, भोर<br>चैतन्य महिला मंडळ |
| १० | जानेवारी | ५४०३ | किनारा वृद्ध व मतीमंद सेवा ट्रस्ट<br>शोध बहुउद्देशिय शोध संस्था |
| ११ | फेब्रुवारी | ४१०८ | केयरिंग हॅंडस, पुणे<br>अमृत वाहिनी ग्रामविकास मंडळ |
| १२ | मार्च २०२३ | ३९८४ | जलहारी फौंडेशन सांगली<br>डोनेट एड सोसायटी |

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण | १२ महीने | ४७९५३ | २३ सामाजिक संस्था |










## सेवा तरंग

**संवाद मेळावे** - वर्ष २०२२-२३ हे सेवावर्धिनीचे रौप्य महोत्सवी वर्ष होते **"सेवावर्धिनीचा प्रसार व विस्तार"** या हेतूने महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांचे ***"संवाद मेळावे"*** आयोजित करण्यात आले. संवाद मेळाव्यात सेवावर्धिनीची माहिती, उपस्थित संस्थांचा परिचय, त्यांच्या अडचणी - आवश्यकता व जिल्ह्यातील महत्वाचे सामाजिक प्रश्न/मुद्दे समजून घेणे व त्यानुसार एकत्रित कामाची शक्यता यावर चर्चा करणे असे मेळाव्याचे स्वरूप होते. प्रत्येक जिल्ह्याचा संवाद मेळा सामान्यतः ४/५ तासांचा आयोजित करण्यात आला. सेवातरंग या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमापूर्वी झालेल्या संवाद मेळाव्यांचा तपशील खाली जोडला आहे.

सेवावर्धिनीमार्फत सहयोगी संस्थांच्या सहकार्याने नवी मुंबई, मुंबई, जव्हार, कळवा, वसई, जळगाव, लातूर, बीड, धाराशिव, नांदेड, परभणी, कोल्हापूर,नाशिक, पुणे महानगर अशा २२ ठिकाणी मेळावे आयोजित करण्यात आले. या मेळाव्यात ९०० पेक्षा जास्त संस्था व १५०० पेक्षा जास्त सेवा संस्था प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या.

## सेवा तरंग स्मरणिका

सेवावर्धिनीच्या रौप्य महोत्सवानिमित्त सेवा तरंग ही स्मरणिका प्रकशित केली. ह्या कार्यक्रमात स्मरणिकेचे प्रकाशन झाले. स्मरणिका कार्यक्रमात आलेल्या संस्थांना तर दिल्याच पण त्या शिवाय आपल्या संपर्कातील इतर संस्थांना देखील देण्यात आल्या. ह्या अधिवेशनात ३८५ संस्थांनी नोंदणी केली होती आणि त्याशिवाय ३५/४० इतर संस्थांनी जागेवर नोंदणी करून सहभाग नोंदवला. स्मरणिकेत संस्थेसंदर्भात जवळपास २२/२३ लेख आहेत. कायद्याची माहिती, सरकारी योजना, नवीन संस्थेची वाटचाल इत्यादी लेख अंतर्भूत आहे. महत्वाचे म्हणजे सेवेची भारतीय संकल्पना आणि सेवावार्धिनीची पार्श्वभूमी ह्याचा समावेश आहे. सेवासंस्था संचालनासंदर्भात माहितीपूर्ण लेखांचा अंतर्भाव आहे. ज्याचा सगळया संस्थांना दैनंदिन कार्यालयात उपयोग होतो आहे. स्मरणिका वाचल्यानंतर आलेले अभिप्राय उत्तम आहेत.


## सेवा तरंग – कार्यक्रम

**सहयोगी संस्था** : प्राज फौंडेशन, पर्सिस्टंट फौंडेशन, मुकुल माधव फौंडेशन,

**प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप :**

सेवावर्धिनी रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांची परिषद, पुणे येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथे घेण्यात आली होती. दोन दिवसीय परिषदेमध्ये संस्था संचालनासाठी लागणाऱ्या विविध सत्रांचा समावेश करण्यात आला. प्राज फौंडेशन, मुकुल माधव फौंडेशन, पर्सिस्टंट फौंडेशन या संस्था परिषदेच्या सह प्रायोजक होत्या.

महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांमधून २२५ संस्थांचे ५०० पेक्षा अधिक प्रतिनिधी व ८४ स्वयंसेवी कार्यकर्ते या परिषदेस उपस्थित होते.




सेवा तरंग परिषदेचे स्वरूप खालील प्रमाणे

उद्घाटन कार्यक्रम

- सेवेची भारतीय संकल्पना – मा. भैय्याजी जोशी
- समांतर सत्र - महाराष्ट्रातील सद्य सामाजिक स्थिती आणि आपली भूमिका
- मुलाखत - पद्मश्री श्री. गिरीश प्रभुणे व पद्मश्री सौ. राहिबाई पोपेरे
- मुलाखतकार – सौ. विनिता तेलंग
- समांतर – स्वयंप्रेरित कार्यकर्ता (volunteer) जोडणी
- एन. जी. ओ. क्लिनिक
  - सी एस आर कनेक्ट - श्री.मुकुंद गोरक्षकर
  - सामाजिक संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन – लेखा परीक्षक श्री. आशुतोष माटे
  - धर्मादाय आयुक्त कार्यालयाची कार्यपद्धती व बदलते नियम - विधिज्ञ – श्री. पराग एरंडे

सहभागी सेवा संस्थांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉलची व्यवस्था केली होती. ११ तारखेला सकाळपासून एकूण ३६ स्टॉल्स वर प्रदर्शन व विक्री सुरु होती.

## वैविध्यपूर्ण सादरीकरणे

- समाजात वैशिष्टयपूर्ण काम करणाऱ्या ५ प्रकल्पांची निवेदने करण्यात आली
  - सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ – FPO (फार्मर्स प्रोड्युसर ऑर्गनायझेशन)
  - आरंभ – ऑटीस्टिक मुलांचे पुनर्वसन

- केशवस्मृती प्रतिष्ठान – स्टेशनवर राहणाऱ्या मुलांचे पुनर्वसन
- दीनदयाळ शोध संस्थान – आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांचे पुनर्वसन
- प्राज फौंडेशन – जलसंधारण

❖ सोशल स्टॉक एक्सेंज – श्री गिरीश सोहनी
❖ सेवावर्धिनी बरोबर समन्वित कार्य
❖ समारोप - विजयराव पुराणिक







## मेळघाट सपोर्ट ग्रुप – कपडे संकलन कार्यक्रम

**स्थळ :** महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटी विमलाबाई गरवारे प्रशाला

**सहयोगी संस्था** : संपूर्ण बांबू केंद्र,

**प्रकल्पात झालेल्या कामाचे स्वरूप :**

दरवर्षी मेळघाट सपोर्ट ग्रुप, कपडे संकलन व याचबरोबर सेवा विषयात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या तीन दिवसीय कार्यक्रमात केलेल्या संपूर्ण बांबू केन्द्राच्या कारागिरांनी बनवलेल्या बांबूच्या कलाकृतीचे प्रदर्शन ठेवले होते. कार्यक्रमाचा समारोप दि. २२ मे २०२२ रोजी मा. भारतीताई ठाकूर यांच्या मुलाखतीने संपन्न झाला.

मा.भारतीताई ठाकूर नर्मदेच्या तीरावरील रहात असलेल्या पण शिक्षणासाठी वंचित असलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवास तिमारातून ज्ञानरुपी तेजाकडे घेऊन जाणाऱ्या कार्यकर्त्या होत.




मा.निरुपमाजी देशपांडे- मेळघाटातील कोरकू बांधवांसाठी बांबूच्या कलाकृतींचे प्रशिक्षण देणाऱ्या व त्यांना स्वतःच्या पावलावर ऊभे करण्यासाठी तन मन धन अर्पून मेळघाट लवादा येथे काम करणाऱ्या.

मा. रविंन्द्रनाथजी सुद्रिक - नगर ता.कर्जत येथे सुमारे २५० अनाथ मुलांना कीर्तनरुपी शिक्षण देउन त्यांची पावले भक्तीमार्गाकडे घेऊन जाणारे.

मुलाखतकर सविता काजरेकर - नामवंत शाळेत उच्च पदांवर काम केलेल्या.

तर सूत्रसंचालिका रसिका लिमये - म ए सो. संस्थेतील शिक्षिका

श्री. अनिरुद्ध देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.



सर्व मान्यवरांचे स्वागत सेवावर्धिनीचे कार्याध्यक्ष सोमदत्तजी पटवर्धन यांनी केले.

भारतीताईंच्या मुलाखतीतून त्यांचा डिफेन्समधील नोकरी सोडून देणे व नर्मदेच्या तिरावरील शिक्षणासाठी वंचित मुलांसाठीचे काम हा प्रवास उलगडत गेला.

# सहयोगी संस्था


10.0 Our Partners
सेवावर्धिनी
praj foundation
Persistent Foundation
Let us be the 'Agents of Change'
Mukul Madhav
Foundation
Established 1999
FINOLEX
PIPES
Atlas Copco
mindtickle
Maharashtra Natural Gas Ltd.
(A JOINT VENTURE OF GAIL (India) Ltd & BPCL)
MNGL
सेकी
SECI
सूर्य सदैव
SUN FOR EVER
Estd 1884
S. P. MANDALI
नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ,नाशिक
॥ विद्या प्रबोधिनी ॥
पाया उज्ज्वल भविष्याचा..
Hind Seva Mandal

# प्रसिद्धी :

## Seva cannot be planned, has to be offered voluntarily: RSS ex-general secretary Joshi

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, FEBRUARY 11



Bhaiyyaji Joshi

SEVA, OR SERVICE is something that cannot be planned and has to be done or offered voluntarily, Bhaiyyaji Joshi, former General Secretary of the Rashtriya Swayamsevak Sangh (RSS), said on Saturday.

"Nobody can retire while doing or offering Seva and nobody can wait for necessary facilities in lieu of giving Seva. The feeling of giving to someone is important while doing Seva. Seva cannot be planned and has to be done voluntarily — after one sees the plight and suffering of people — with the intention of changing their lives," Joshi said.

He was delivering the key note address on the topic "Indian Perspective of Seva" during "Seva Tarang" — a two-day state-level conference of voluntary organisations organised by Sevavardhini at Mahatma Phule Sanskrutik Bhawan in Wanowarie.

MLA Sunil Kamble, Honorary President of Sevavardhini Dr Pramod Chaudhari, Sevavardini executive president Kishor Desai, industrialist Sudhir Mehta, Yogita Apte, Mandar Pophale and Saurabh Dhanorkar of Persistent Foundation, Praj Foundation and Mukul Madhav Foundation respectively, and Sevavardhini secretary Somdatta Patwardhan, among others, were present on the occasion.

Dr Chaudhari said, "I am optimistic that Sevavardhini's work will help the country while it is celebrating 75 years of independence."

Mehta said the country's politicians and bureaucrats cannot alone change the country, adding the role of voluntary organisations and education institutions is equally important.

Citing the Covid period, he said, "This showed that if all work together, we can show the world what the country can do."

A souvenir, comprising the work done by Sevardhini in the last 25 years, was also released on the occasion.

C

---



## जल संवर्धन के लिए कुशल कर्मियों की जरूरत

### पुणे विद्यापीठ के पूर्व कुलगुरु डॉ. नितिन करमालकर के विचार

■ पुणे, ब्यूरो. जल हमारा सबसे प्यारा विषय है. आज जब हम जलसंवर्धन एवं जल प्रबंधन के विषय पर बोलते हैं तब हमे अहसास होता है कि हमारे पूर्वजों द्वारा इस संदर्भ में पनाई गई प्रणाली को हम भूल चुके हैं. आज के समय में यदि जलसंवर्धन के क्षेत्र में शाश्वत कार्य करना हो तो इसके लिए कुशल कर्मियों की जरूरत पड़ेगी. उक्त विचार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ के पूर्व कुलगुरु डॉ. नितिन करमालकर ने किया.

**सेवावार्धिनी संस्था की ओर से तीन दिवसीय जलदूत उपक्रम का समापन**

स्वयंसेवी संस्था की सेवावर्धिनी की ओर से चलाए गए जलसंचय उपक्रम जलदूत 2.0 का समापन यशदा के सभागृह में हुआ. इस समय डॉ. करमालकर ने कहा कि इस देश में धोलावीरा जैसे जगह पर 2500 हजार साल पुरानी जल प्रबंधन व जलसंवर्धन पद्धति को जानने की जरूरत हमारी पीढ़ी को है. उसे जानकारी के साथ-साथ इस क्षेत्र में शाश्वत प्रयास करने की भी जरूरत है. इस दृष्टि से कौशल आधारित प्रशिक्षणार्थी तैयार करने की जरूरत समय की है. यही काम सेवावर्धिनी कर रही है. इसकी उन्हें खुशी है. करमालकर ने कहा कि हमारे देश में नदियों की स्थिति भयावह हो गई है. इसकी पुनरावृत्ति से बचना है तो शास्त्रीय संशोधनात्मक अध्ययन के साथ पारंपरिक ज्ञान की जरूरत है.



जल प्रबंधन व जलसंवर्धन क्षेत्र में बेहतर काम करने वाले जलदूतों का सम्मान

### नई शिक्षा नीति में जल संवर्धन शामिल करें

करमालकर ने कहा कि केंद्र सरकार नई शैक्षणिक नीति पर काम कर रही है. जलव्यवस्थापन, जलसंवर्धन एवं जलदूत का अंतर्भाव कैसे किया जा सकेगा इस पर हम जरूर काम करें. उक्त आश्वासन डॉ. करमालकर ने दिया. हरिदास राऊत, कृष्णा राऊत, योगेश गावित, अजित गावित, मधुकर गागरे, किरण सूर्यवंशी, जैसे जलदूतों को सम्मानित किया गया. इस समय सेवावर्धिनी के सचिव सोमदत्त पटवर्धन, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद कुलकर्णी, यशदा के उपसंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, यशदा के जल साक्षरता केंद्र के संचालक आनंद पुसावले, जलदूत, इस पूरे प्रकल्प की आर्थिक मदद करनेवाले एटलास कॉप्को के कॉर्पोरेट एचआर प्रमुख कबीर गायकवाड, सीएसआर के व्यवस्थापक अभिजित पाटिल आदि इस समय उपस्थित थे.

---

## सेवेमध्ये करुणेपेक्षा संवेदनेला महत्त्व : भैयाजी जोशी

पुणे : करुणेचा भाव आणि संवेदना यामध्ये सूक्ष्म भेद आहे. करुणा या भावनेत 'मी'पणा आहे. मात्र, मला जे मिळाले ते पुढे समाजाला द्यायचे आहे. मला समाजात दिसत असलेल्या अडचणी, संकटे, दुःख दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायचा आहे ही संवेदना सेवेमध्ये महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी यांनी केले. सेवावर्धिनी या सेवाभावी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त व पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत पुण्यात 'सेवा तरंग' या दोनदिवसीय राज्यस्तरीय स्वयंसेवी संस्था परिषदेचे आयोजन केले आहे. राज्यस्तरीय परिषद वानवडीतील महात्मा फुले सांस्कृतिक भवनमध्ये संपन्न होत आहे. सेवावर्धिनीचे मानद अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी, कार्याध्यक्ष किशोर देसाई, कार्यवाह सोमदत्त पटवर्धन, आमदार सुनील कांबळे, परिषदेचे स्वागताध्यक्ष सुधीर मेहता, मुकुल माधव फाउंडेशनचे सौरभ धानोरकर, पर्सिस्टंट फाउंडेशनच्या योगिता आपटे आणि प्राज फाउंडेशनचे मंदार पोफळे आदी या वेळी उपस्थित होते.

---

## नातवाच्या आजारपणामुळे नैसर्गिक शेतीकडे वळाले

### राहिबाई पोपरे यांनी उलगडला रसायनमुक्त शेतीचा प्रवास

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. १२** - माझ्या मोठ्या नातवाच्या आजारपणामुळे मला रसायनयुक्त अन्नधान्याचे दुष्परिणाम जाणवले. त्यानंतर मी देशी बिया आणि रसायन मुक्त अन्न वापरत नैसर्गिक शेती करायचे ठरवले. लहानपणापासून शेतीचे ज्ञान होतेच, त्यातून देशी बियांच्या वाणांची साठवणूक करायला सुरुवात केली आणि पाहता पाहता तिचे रूपांतर देशी बियांच्या बँकेमध्ये झाले. घरातच नव्हे, तर आसपासच्या गावातही लोक आता देशी, नैसर्गिकरीत्या पिकवलेल्या अन्नधान्यांचा वापर करत असल्याचे पाहून मनापासून आनंद होत आहे. अशा शब्दांत राहीबाई पोपेरे यांनी आपला प्रवास उलगडला.

सेवावर्धिनी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधत पुण्यात 'सेवा तरंग' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. राहीबाई पोपेरे आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाला. विनिता तेलंग यांनी ही मुलाखत घेतली. यावेळी 'आरएसएस'चे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी, 'सेवावर्धिनी'चे कार्याध्यक्ष किशोर देसाई, कार्यवाह सोमदत्त पटवर्धन, सहकार्यवाह माणिक दामले, स्वागताध्यक्ष सुधीर मेहता, संस्थेचे जयराज फणसाळकर, पद्मा कुबेर उपस्थित होते.

'आरएसएस'च्या माध्यमातून तुळजापूर येथील एका गावात काम करताना भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांच्या जीवनातील अनेक हृदयद्रावक घटना माझ्यासमोर घडल्या. या समाजातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, मुलांचे होणारे हाल पाहून त्यांच्यासाठी काहीतरी काम केले पाहिजे असे वाटले. त्यातून यमगरवाडी येथे पारधी समाजातील मुलांसाठी वसतिगृह व्यवस्था उभी राहिली. असे सांगून प्रभुणे यांनी आपला अनुभव प्रवास उलगडला.

---

पुढारी
www.pudhari.com | pudharinews | 020/67639900

## ऐतिहासिक बंगाळी बारवची स्वच्छता सुरू

### जेजुरी पालिका, सेवावर्धिनी संस्थेचा उपक्रम

जेजुरी : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री खंडोबा देवाच्या जेजुरीनगरीत ऐतिहासिक काळात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी भाविकांसाठी निर्माण केलेली ऐतिहासिक बंगाळी बारव सध्या दुर्लक्षित झाली आहे. पुणे येथील सेवावर्धिनी संस्था, माय इंटिकल कंपनी, पवार महाविद्यालय आणि जेजुरी नगरपालिकेच्या वतीने या ऐतिहासिक बारवची स्वच्छता सुरू करण्यात आली आहे.

या तलावातील पाणी सायफन पद्धतीने शहरातील विविध १२ जलतीर्थ व हौदात सोडण्याची योजना ऐतिहासिक काळात केली होती. काळाच्या ओघात यातील अनेक तीर्थ व विहिरींचे अस्तित्व नष्ट होत चालले आहे. जेजुरी येथील बंगाळी पटांगणात असणारी बारव दुर्लक्षित झाली आहे. या बारवमध्ये दगडगोटे, गाळ, घाण साचली असून, मोठ्या प्रमाणात झाडी उगवली आहेत. अशा दुर्लक्षित बारवचे पुनर्जीवन करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

सेवावर्धिनी संस्था, माय इंटिकल कंपनी, जेजुरी नगरपालिका आणि पवार महाविद्यालय जेजुरी यांच्या वतीने शनिवारी (दि. ११) या बारवेत स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली. सेवावर्धिनी संस्थेचे प्रमोद काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू करण्यात आली असून, कंपनीच्या रैना दुबे, पवार महाविद्यालयाचे डॉ. अरुण कोळेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे किरण बारभाई, सागर गोडसे, नगरपालिकेचे बाळासाहेब बगाडे, स्वामी समर्थ सेवा सर्व्हिसचे गोपाळ मोहरकर, भानुदास दावलकर, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

**राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्याकडून निर्मिती**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी खंडोबाभक्तांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी जेजुरी शहराच्या पश्चिमेला सुमारे १८ एकर परिसरात भव्य होळकर तलावाची निर्मिती अठराव्या शतकात केली.



जेजुरी येथील बंगाळी पटांगणातील ऐतिहासिक बारवची स्वच्छता मोहीम राबविताना कार्यकर्ते. (छाया : नितीन राऊत)

My Gramin Edition
Mar 12, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

---

## जलसंवर्धनाच्या क्षेत्रातील शाश्वत कार्यासाठी कौशल्याधारित मनुष्यबळ गरजेचे : डॉ. करमळकर

पुणे : आजच्या काळात जलसंवर्धनाच्या क्षेत्रात शाश्वत कार्य करावयाचे असल्यास कौशल्याधारित मनुष्यबळ गरजेचे असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

सेवावर्धिनी या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या जलदूत २.० या जलसंधारणातील पथदर्शी उपक्रमाचा समारोप झाला. त्यावेळी ते बोलत होते. सेवावर्धिनी संस्थेचे सचिव सोमदत्त पटवर्धन, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद कुलकर्णी, यशदाचे उपसंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, यशदाच्या जल साक्षरता केंद्राचे संचालक आनंद पुसावळे, जलदूत या संपूर्ण प्रकल्पाला आर्थिक मदत करणाऱ्या ॲटलास कॉप्को कंपनीचे कॉर्पोरेट एचआर प्रमुख कबीर गायकवाड, कंपनीच्या व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) विभागाचे व्यवस्थापक अभिजित पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

'जलदूत' हा सेवावर्धिनीचा जल संधारणातील एक पथदर्शी प्रकल्प असून गेली १३ वर्षे संस्था संपूर्ण राज्यभरात २५ गावांमध्ये जलसंधारण क्षेत्रात कार्यरत आहे. २०१५ ते १७ या काळात संस्थेच्या वतीने जलदूत १ तर २०१९ ते २३ या कालावधीमध्ये जलदूत २.० हे दोन्ही प्रकल्प ॲटलास कॉप्को या कंपनीच्या सक्रीय व आर्थिक सहभागाने पार पडले. जलदूत २.० प्रकल्पात तब्बल २१ सहयोगी संस्था सहभागी झाल्या होत्या. याशिवाय एकूण ३ विद्यापीठे, विविध शासकीय आस्थापनांचा सहभाग हे जलदूत २.० चे खास वैशिष्ट्य होते. या सर्व संस्था व जलदूत यांचा सहभाग असलेला तीन दिवसीय कार्यक्रम नुकताच यशदा येथे झाला. यावेळी जलपूजन करीत कार्यक्रमाला औपचारिक सुरुवात झाली. सेवावर्धिनीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'जलदूत-पथिक शाश्वत विकासाचा' या पुस्तिकेचे प्रकाशन देखील यावेळी झाले.

याबरोबरच हरिदास राऊत, कृष्णा राऊत मुरुमहाटी, ता. त्रिंबक, जि. नाशिक (प्रथम क्रमांक), योगेश गावित, अजित गावित रगतविहिर, ता. सुरगणा, जि नाशिक (द्वितीय क्रमांक), मधुकर गागरे, किरण सूर्यवंशी कानडगाव, ता. राहुरी, जि. अहमदनगर (तृतीय क्रमांक) या जलदूतांनी त्यांच्या गावांमध्ये केलेल्या कार्याचा सन्मान करीत त्यांना पारितोषिके देण्यात आली. तर वनवासी कल्याण आश्रम, नाशिक (प्रथम क्रमांक), संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी, नांदेड (द्वितीय क्रमांक), नवी उमेद, पांढरकवडा, यवतमाळ (तृतीय क्रमांक) या स्वयंसेवी संस्थांना देखील गौरविण्यात आले.

डॉ. करमळकर म्हणाले, आज केंद्र सरकार नव्या शैक्षणिक धोरणावर काम करीत आहे. यामध्ये जलव्यवस्थापन, जलसंवर्धन आणि जलदूत यांचा अंतर्भाव कसा करता येईल यावर आम्ही नक्की काम करू, असे आश्वासन यावेळी डॉ. करमळकर यांनी दिले. प्रमोद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. हर्षन पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सोमदत्त पटवर्धन यांनी आभार मानले.



सेवावर्धिनीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'जलदूत- पथिक शाश्वत विकासाचा' या पुस्तिकेचे प्रकाशन झाले. यावेळी (डावीकडून) सोमदत्त पटवर्धन, डॉ. नितीन करमळकर, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आणि अभिजित पाटील आदी.